सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००४१७-२०१२

नियमित दिवाणी दावा क्र. ११४/२०१२

निशाणी क्र.२५२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ड यांनी मयत प्रतिवादी क्र.११ यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होवून त्यांचे वारस दाव्यात सामील करुन घेण्याची परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी क्र.१ड यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.११ जगन्नाथ भास्कर घाडी हे दि.२८/०६/२०२५ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस ९० दिवसात म्हणजेच दि.२७/०९/२०२५ पर्यंत रेकॉर्डवर आणणे गरजेचे होते. सदरचे वारस मुदतीत रेकॉर्डवर न आणल्यामुळे प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र.११ विरुद्ध अबेट झाला आहे. प्रतिवादी क्र.११ मयत झाल्याचे वादीस हल्लीच समजून आले. वादीने हेतुपुरस्सर बेफिकिरीने प्रतिवादी क्र.११ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर आणण्यास विलंब केलेला नाही. सदर विलंब माफ न झाल्यास वादीचे पैशाच्या स्वरुपात कधीही भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणारे आहे. सबब, प्रतिवादी क्र.११ विरुध्द अबेटमेंटचा आदेश बाजूस सारण्यास झालेला २ महिने १२ दिवसांचा विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवला आहे.

०४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटपा करिता दाखल केलेला आहे.

०५. सदर कामी नि.क्र.२५४ सोबत दाखल केलेल्या मयत प्रतिवादी क्र.११ जगन्नाथ भास्कर घाडी यांच्या मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.११ जगन्नाथ भास्कर घाडी हे दि.२८/०६/२०२५ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतचा अर्ज वादीने मुदतीत दाखल केलेला नाही. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.११ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झाल्याचे स्पष्ट होते. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व दाव्यातील वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## - आदेश -

१. अर्ज नि.क्र.२५२ मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र.१ड यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग यांस खर्चाची रक्कम रुपये २००/- देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र.११ यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ करणेत येत आहे.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.02.11 16:36:11 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड

दिनांकः११/०२/२०२६